६२७०

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय ग्रा० ग्रं०
दा. क्र. ६२७०

IRBK-0106270
IRBK-0106270







म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय का. वा
दा. क्र. ९२८०



# कथासरित्सागर

## बाहुशाली भीमभट

प्र. शं. जोशी

2 DEC 1975

६२७०

# बाहुशाली भीमभट

२२५००
६०

प्र. शं. जोशी

म. औ. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
ग्रा. क्र. ६२७० नों. दि ........
वि. ...

IRBK-0106270

नये पैसे

वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड,
३, राउंड बिल्डिंग, काळबादेवी रस्ता, मुंबई २

प्रकाशक :

एम्. के. वोरा
वोरा अॅण्ड कंपनी,
पब्लिशर्स (प्रायव्हेट) लि०
३ राउंड बिल्डिंग,
काळबादेवी रस्ता, मुंबई २

किंमत चाळीस नये पैसे
पहिली आवृत्ति : १९५७
सर्वाधिकार प्रकाशकाधीन

मुद्रक :

जयंत श्रीधर टिळक,
केसरी मुद्रणालय,
५६८ नारायण पेठ, पुणे २

# प्रकाशकाचें निवेदन

व्यास व वाल्मीकि हे महाकवि आपल्या परिचयाचे आहेत. पण त्यांच्याच तोडीचा महाकवि गुणाढ्य मात्र अनेकांना माहीतहि नसतो. कालिदास, बाण, सुबंधु इत्यादि संस्कृत कवींनीं गुणाढ्याच्या 'बृहत्कथे'चा मोठा गौरवपूर्वक उल्लेख केला आहे. गोवर्धन कवीनें तर गुणाढ्याला महर्षि व्यासांचा अवतारच मानिलें आहे. गुणाढ्यानें 'बृहत्कथा' नांवाचें आपलें महाकाव्य 'पैशाची' नांवाच्या प्राकृत भाषेंत लिहिलें. पण तें इतकें लोकप्रिय झालें कीं, 'बृहत्कथामंजरी', 'कथासरित्सागर', 'बृहत्कथासंग्रह' इत्यादि अनेक संस्कृत ग्रंथ त्यावरून रचले गेले. 'बृहत्कथा' हा ग्रंथ बाराव्या शतकापर्यंत उपलब्ध होता असें अनुमान विद्वानांनीं काढलें आहे. पण त्यानंतर मात्र या महाकाव्याला दुर्दैवानें आपण पारखे झालों. गुणाढ्या-संबंधींहि विश्वसनीय ऐतिहासिक माहिती आपणांस मिळत नाहीं.

'संस्कृत साहित्य सरिता' हा प्रकाशन-संच आम्हीं गतवर्षी प्रसिद्ध केला त्यांत सर्व प्रसिद्ध संस्कृत ललित वाङ्मय संक्षिप्त कथारूपानें दिलें आहे. या आमच्या प्रकाशनाचें सर्वत्र अत्यंत उत्साहानें स्वागत झालें. भारताचें सांस्कृतिक वाङ्मयीन धन मराठी मायबोलींतून सर्वसामान्य मराठी वाचकवर्गाच्या हातीं, अल्पमूल्यांत देण्याच्या या उपक्रमाबद्दल आमच्यावर धन्यवाद-अभिनंदनांचा खरोखरी वर्षाव झाला. याबद्दल आम्ही सर्वांचे ऋणी आहोंत.

याच दृष्टीनें हें पुढलें पाऊल आम्हीं टाकलें आहे. 'संस्कृत साहित्य सरितें'त आम्हीं अनेक लेखकांचें सहकार्य घेतलें होतें. 'कथासरित्सागरा'चीं हीं दहाहि पुस्तकें मात्र श्री. प्र. शं. जोशी, एम्. ए., बी. टी., काव्यतीर्थ, व्याकरणविशारद यांनीं एकट्यांनींच अनुवादित व संकलित केलेलीं आहेत.

# कथानकाची भूमिका

नरवाहनदत्त ललितलोचना नांवाच्या आपल्या प्रियेसह वनविहार करीत असतां फुलें वेंचण्याच्या नादांत त्याची प्रिया खूप दूर गेली व दिसेनाशी झाली. शोध करूनहि तिचा पत्ता लागेना तेव्हां शोकानें नरवाहनदत्ताला मूर्च्छा आली. त्या वेळीं पिशंगजठ नांवाचा एक मुनि त्या बाजूला आला होता. त्यानें नरवाहनदत्ताला सावध केलें. धैर्याचें महत्त्व पटवून देण्यासाठीं त्यानें नरवाहनदत्ताला मृगांकदत्ताची कथा सांगितली.

अयोध्याधिपति अमरदत्तानें, मंत्र्याच्या दुष्ट सल्ल्यावरून आपला मुलगा मृगांकदत्त व त्याचे दहा मंत्री यांना हद्दपार केलें. ते सर्वजण एका अरण्यांत आले असतां, आत्महत्त्या करण्याच्या विचारांत असलेल्या एका दुष्ट मांत्रिकाला मृगांकदत्तानें मदत केली. तेव्हां 'पारावत' नागानें "तुमचा एकमेकांशीं वियोग होईल" असा त्यांना शाप दिला. त्याच क्षणीं सर्वांची दृष्टि व श्रवणशक्ति नष्ट झाली व ते एकमेकांना दिसेनासे झाले. कांहीं काळानें त्या सर्वांची पुन: भेट झाली व पराक्रमानें त्यांनीं मोठें राज्य कमावलें. हा कथाभाग कथासरित्सागराच्या बाराव्या लंबकांत आला आहे. यावरूनच दंडीनें 'दशकुमारचरिता'ची कल्पना उचलली असावी.

नागाच्या शापामुळें घडलेल्या वियोगानंतर भेटलेल्या चार-पांच मित्रांसह मृगांकदत्त एका लताकुंजांत आला असतां एक हत्ती एका आंधळ्याची शुश्रूषा करीत असल्याचें दृश्य त्याला दिसलें. त्या आंधळ्याच्या विनंतीवरून हत्तीनें पाहिल्यापासून जी आपली माहिती सांगितली, ती माहिती म्हणजेच प्रस्तुत भीमभटाची कथा होय.

# बाहुशाली भीमभट

### शीलधरावर अन्याय

प्राचीन काळीं एकलव्या नांवाची एक सुंदर नगरी होती. त्या नगरींत श्रुतधर नांवाचा एक राजा राज्य करीत होता. त्याला दोन राण्या होत्या. एकीच्या मुलाचें नांव शीलधर व दुसरीच्या मुलाचें नांव सत्यधर. शीलधराची आई पट्टराणी होती व तो आपल्या भावापेक्षां वयानें वडील होता, म्हणून श्रुतधरानें त्याला युवराजपद देऊं केलें. राज्यकारभाराची बरीचशी जबाबदारी शीलधरानें आपल्या शिरावर घेतली व ती अत्यंत यशस्वीपणें पार पाडली. त्यामुळें तो अत्यंत लोकप्रिय झाला. त्याचा हा उत्कर्ष सत्यधराला मुळींच सहन झाला नाहीं. सत्यधरानें आपल्या स्वार्थी मित्रांच्या मदतीनें एक मोठा कट रचला व आपल्या वृद्ध वडिलांना न जुमानतां त्यानें शीलधराला हद्दपार केलें व राज्यकारभाराचीं सूत्रें स्वतःच्या हातीं घेतलीं. प्रजेला त्याचें हें कृत्य आवडलें नाहीं. पण सर्वजण मूग गिळून गप्प बसले.

• • •

### भगवान् शंकरांचा प्रसाद

सर्वांचा आधार असलेला बिचारा शीलदार निराधार होऊन रानावनांत भटकूं लागला. भावाची पुंडाई असह्य झाल्यानें तो सूडाच्या भावनेनें पेटला होता. दुसरा कोणताहि मार्ग न दिसल्यानें त्यानें शंकराची खडतर तपश्चर्या करण्यास सुरुवात केली. अनेक दिवसांच्या तपामुळें प्रसन्न होऊन शंकरांनीं त्याला दर्शन दिलें. तेव्हां त्यांना वंदन करून शीलधर म्हणाला, " न्यायानें मिळालेलें माझें राज्य बळकावून सत्यधरानें

मला हद्दपार केलें आहे. तेव्हां त्याचें पारिपत्य करण्यासाठीं, अलौकिक सामर्थ्य असलेला गंधर्व होण्याची माझी इच्छा आहे." तें ऐकून शंकर त्याला म्हणाले, "बाबारे ! तूं इकडे तपश्चर्येंत गढून गेला असतांनाच तुझा भाऊ यमसदनाला गेला आहे. तेव्हां तूं त्याच्यावर सूड कसा उगवणार ? त्यांतूनहि तुझा तसा निश्चयच असेल, तर पुढील जन्मीं तुला तो पूर्ण करतां येईल. राढा नगरींत उग्रभट नांवाचा एक राजा आहे. मनोरमा ही त्याची पट्टराणी असली, तरी देखील लास्यवती ही त्याची अधिक आवडती राणी आहे. लवकरच सत्यधर लास्यवतीच्या पोटीं जन्म घेईल. त्यापूर्वींच तूं देहत्याग करून मनोरमेच्या उदरीं जन्मास ये आणि त्याच्यावर सूड उगव."

शंकरांनीं सांगितलेला हा उपाय ऐकून शीलधराला अत्यंत आनंद झाला. तो त्याच्या नेत्रावाटें ओसडत होता. तें पाहून शंकर त्याला म्हणाले, "शीलधरा ! असा आनंदानें बेहोष होऊं नको. सूडबुद्धि बाळगून तूं हें तप केलें असल्यामुळें, पुढील जन्मीं मुनीच्या शापामुळें राज्यभ्रष्ट होऊन तुला हत्तीचा जन्म घ्यावा लागेल." परमेश्वराचे हे शब्द ऐकून शीलधराच्या चेहऱ्यावरील आनंद मावळला. त्याचा चेहरा खर्रकन् उतरला. तो शंकरांजवळ गयावया करूं लागला. तेव्हां शंकर पुनः म्हणाले, "वत्सा ! घाबरूं नको. पशुयोनींतहि तुझी मनुष्यवाणी लुप्त होणार नाहीं. त्या वेळीं तुला पूर्वजन्मींचें स्मरणहि राहील. तूं जेव्हां एका दुःखी व आंधळ्या प्रवाश्यावर उपकार करशील व त्याला आपली सर्व हकीगत सांगशील त्या वेळीं तुझी हत्तीच्या देहांतून मुक्तता होईल व तूं गंधर्व बनशील." असें आश्वासन देऊन शंकर अन्तर्धान पावले. नंतर तपश्चर्येनें कृश झालेलें आपलें शरीर शीलधरानें गंगेच्या प्रवाहांत टाकून दिलें.

• • •

## उग्रभटाचा नर्तकीशीं विवाह

या घटनेच्या आधीं कांहीं वर्षांपूर्वी उग्रभट राजाच्या दरबारीं लासक नांवाचा एक प्रसिद्ध नर्तक आला. त्याचे नृत्याचे प्रयोग अत्यंत बहारीचे झाले. लास्यवती नांवाच्या त्याच्या मुलीनें 'मोहिनीनृत्य' केलें. अमृत वाढण्याच्या वेळीं 'मोहिनी' म्हणून वावरणाऱ्या, स्त्रीभूमिकेंतील विष्णूचें काम करून तिनें सर्वांनाच मोहून टाकलें. आपल्या सौंदर्यानें व मुग्ध आणि मोहक हावभावांनीं तिनें राजाला वेडच लावलें. उग्रभटानें लासकाला खूप संपत्ति दिली व लास्यवतीशीं विवाह करण्याची आपली इच्छा प्रदर्शित केली. 'आपल्या मुलीला राणी होण्याचें भाग्य लाभणार' या विचारानें त्याला हर्ष झाला. त्यानें लागलीच राजाची विनंति मान्य केली. विलंब न लावतां एका शुभ मुहूर्तावर राजानें तिच्याशीं विवाह केला. मनोरमेपेक्षांहि ती त्याची अधिक आवडती राणी झाली.

• • •

## भीमभटाला पुत्रप्राप्ति

राजानें एका नर्तकाच्या मुलीशीं लग्न करणें पट्टराणी मनोरमेला मुळींच पसंत नव्हतें. पण स्वतःला मूलबाळ नाहीं, तेव्हां निदान तिच्या-मुळें तरी राजवंश अखंडित राहील या कल्पनेने तिनें समाधान मानून घेतलें. बरींच वर्षें गेलीं; तरी राजाला पुत्र झाला नाहीं. त्यामुळें तो नेहमीं खिन्न व निरुत्साही असे. शेवटीं त्यानें 'पुत्रकामेष्टि' यज्ञ केला. यज्ञांतील हविर्द्रव्याचा मोठा भाग त्यानें पट्टराणी मनोरमेला दिला व राहिलेला भाग लास्यवतीनें भक्षण केला. यज्ञदेवाच्या प्रसादानें दोघींहि गर्भवती झाल्या. राजाची कित्येक वर्षांची इच्छा सफळ झाली. त्यानें त्यांचे डोहाळे पुरविले. योग्य काळीं त्या प्रसूत झाल्या. राजाचा हर्ष तर गगनांत मावेना. मनोरमेचा मुलगा कांहीं दिवसांनीं वयानें वडील होता. राजानें दोघांचींहि बारशीं मोठ्या थाटामाटानें साजरीं केलीं. मोठ्या मुलाचें

नांव ठेवलें भीमभट व धाकट्याचें समरभट. मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात हेंच खरें. कारण भांडण न होतां दोघांचा एकहि दिवस गेला असेल तर शपथ !

अगदीं लहानपणीं, त्यांना कळत नव्हतें, म्हणून त्यांच्या आई-वडिलांनीं त्यांच्या खोड्यांकडे दुर्लक्षच केलें. पण थोडे मोठे झाल्यावर, जाणूनबुजून ते एकमेकांच्या कुरापती काढूं लागले. खेळ असो वा विद्याभ्यास असो, दोघांची एकमेकांशीं स्पर्धा व मत्सर हें ठरलेलें ! नेहमीं तक्रारी करून त्यांनीं उग्रभटाला अगदीं भंडावून सोडलें. त्यांच्यापुढें त्याची कांहीं मात्रा चालेना. दोघांतील वैरभाव वाढूं लागला.

• • •

## मुलांचा द्वाडपणा व त्याचा विचित्र परिणाम

एकदां दोघांनीं एकमेकांना कुस्तीचें आव्हान दिलें. कुस्ती जुंपली. समरभटानें कुस्ती चालली असतां, भीमभटाच्या मानेवर जोरानें कांहीं ठोसे लगावले. त्यामुळें भीमभट खवळला. त्यानें चपळाईनें समरभटाची पाठ पकडली व त्याला उंच उचलून जोरानें जमिनीवर आपटलें. समरभटाची छाती व तोंड सडकून निघालें. तो रक्त ओकूं लागला. तेव्हां भीमभटानें त्याला सोडून दिलें. समरभटाच्या सेवकांनीं त्याला त्याच्या आईकडे आणलें. सवतीच्या पोरानें आपल्या बाळाची केलेली ती अवस्था पाहून, तिचा राग अनावर झाला. आपल्या मुलाचे प्राण धोक्यांत आणणाऱ्या भीमभटाचा कांटा काढायचा, असा तिनें निश्चय केला व आपल्या मुलाच्या गळ्यांत गळा घालून, ती मोठ्यान आक्रोश करूं लागली.

इतक्यांत राजा त्या ठिकाणीं अचानक आला. त्याला पाहून लास्यवतीच्या दुःखाला भरतें आलें. ती मोठ्यानें गळा काढून रडूं लागली. जमिनीवर कपाळ आपटून घेऊं लागली. जवळच रक्तबंबाळ झालेला समरभट कण्हत पडला होता. राजानें तिच्या दुःखाचें कारण विचारलें.

तेव्हां समरभटाकडे बोट दाखवीत ती म्हणाली, "हा पहा तुमच्या त्या लाडक्या बाळाचा पराक्रम ! त्यानें माझ्या या पोराचा जीव घ्यायचा तेवढा शिल्लक ठेवला आहे. तो याला नेहमींच छळत असतो. पण 'मुलामुलांच्या भांडणांत आपण कशाला लक्ष घाला' या विचारानें मीं त्याच्याकडे इतके दिवस दुर्लक्ष केलें. पण आतां त्याचा कायमचा बंदोबस्त करायची वेळ आली आहे. तुमच्या हातून या बाबतींत कांहीं झालें नाहीं, तर माझा हा बाळ फार काळ जिवंत राहील असें मला वाटत नाहीं." राणीचे ते शब्द ऐकून भीमभटाला कडक शासन करण्याचें आश्वासन त्यानें दिलें. राजवैद्याला बोलावून समरभटावर औषधोपचार करण्यास त्यानें आपल्या कारभाऱ्याला सांगितलें व तो मनोरमेच्या महालांत आला.

कसलीहि विचारपूस न करतां तो भीमभटाला खूप बोलला. मनोरमा राणी मध्यस्थी करूं लागली, तेव्हां तिच्यावरहि तो रागावला. भीमभटाच्या सर्व सवलती त्यानें काढून घेतल्या व त्याची बिदागीहि बंद केली. आपलें भांडार समरभटाच्या स्वाधीन केल्याची घोषणाहि त्यानें तेथें केली व तो तडक आपल्या महालांत आला. समरभटाच्या केंसालाहि यापुढें धक्का लागूं नये म्हणून त्यानें त्याच्या रक्षणासाठीं शंभर राजपुत्र नेमले.

• • •

## आईची भीति व भीमभटाची निर्भय वृत्ति

तें सर्व पाहून पट्टराणी मनोरमेला अत्यंत वाईट वाटलें. भीमभटाला जवळ घेत ती त्याला म्हणाली, "बाळ ! त्या नर्तकीच्या पोरासाठीं तुझ्या वडिलांनीं तुझे हक्क हिरावून घेतले आहेत. यापुढें ते तुला आपल्या सांवलीलाहि उभा राहूं देणार नाहींत. तेव्हां येथें अपमानाचें जिणें जगण्यापेक्षां तूं आजोळीं जा. तुझ्या आजोबांना मूल नसल्यामुळें

तुला पाटलीपुत्राचें राज्य देण्याचा त्याचा पूर्वीपासूनच विचार आहे. येथें रहाण्यांत समरभटाकडून तुझ्या जीविताला धोका आहे असें दिसतें."

यावर आईला धीर देत भीमभट म्हणाला, "आई! तूं कसलीहि काळजी करूं नको. कांहीं झालें तरी मी जातीचा क्षत्रिय आहें. मरणाला भिऊन दुसऱ्याला शरण जाणें ही गोष्ट माझ्या हातून कधींहि घडणार नाहीं. एक तुझा आशीर्वाद असला म्हणजे पुरे. मग माझ्या केंसालाहि धक्का लावण्याची कोणाची छाती आहे!"

आजोळीं जायचा त्यांचा विचार नाहीं हें पाहून मनोरमेला त्याच्याबद्दल अधिकच काळजी वाटूं लागली. प्रसंग ओढवलाच तर भीमभटाच्या मदतीला कांहीं लोक असावेत या विचारानें आपल्या अंगावरील दागिने उतरवून त्याच्यापुढें ठेवीत ती म्हणाली, "बाळा! तुझे वडील यापुढें आपल्याला खर्चासाठीं एक कवडीहि देणार नाहींत आणि पैशाशिवाय तर इकडची काडी तिकडे हालत नाहीं. तेव्हां हे दागिने विकून कांहीं रक्कम उभार व तिच्या जोरावर चार लोक हातांशीं ठेव. प्रसंग आलाच, तर सुरक्षितपणें निसटून जाण्याच्या दृष्टीनें तरी, त्यांची मदत होईल." आईचें तें प्रेम पाहून भीमभटाचा गळा दाटून आला. तो तिला म्हणाला, "आई! माझ्यासाठीं तूं हें सौभाग्यलेणें विकायला तयार होऊं नको. शिवाय बाबांना ही गोष्ट कळली, तर ते तुझ्याशींहि अगदींच फटकून वागूं लागतील व माझ्या हाताशीं चार लोक आहेत हें लक्षांत आल्यावर समरभटहि माझ्याबरोबर उघड उघड शत्रुत्व करूं लागेल. तेव्हां केवळ तुझा आशीर्वाद माझ्या पाठीशीं असला म्हणजे मी कोणालाहि भीक घालीत नाहीं." तें ऐकून मनोरमेचा अगदीं नाइलाज झाला. केवळ मुलाच्या पराक्रमावर विसंबून तिनें मनाला धीर दिला व आपल्या नशिबीं पुढें काय वाढून ठेवलें आहे याचा विचार करीत ती उगीच राहिली.

● ● ●

## समरभटाची सूडवृत्ति

शूर व सत्याप्रिय भीमभट लोकप्रिय युवराज होता. तोच खरा राज्याचा वारस असतांना राजानें त्याचा संबंध तोडला हे ऐकून प्रजाजनांना अत्यंत दुःख झालें. कांहींना तर राजाच्या या अन्यायी वागणुकीची चीड आली. कांहीं प्रमुख नागरिकांनीं भीमभटाची भेट घेतली व त्याला आंतून मदत करण्याचें आश्वासनहि दिलें. त्यांचें तें अकृत्रिम प्रेम पाहून भीमभटाला बराच उत्साह वाटला. राजाशीं संबंध तुटला असला तरी प्रजेच्या मदतीनें तो राज्यांत स्वतंत्रपणें वावरूं लागला. समरभटाला तें देखील सहन झालें नाहीं. भीमभटाचा कायमचा कांटा काढायचा असें ठरवून त्यासाठीं कट रचण्यांत तो गढून गेला.

त्याच्या या कटाचा सुगावा शंखदूत नांवाच्या त्याच्या एका शूर मित्राला लागला. शंखदूताला समरभटाचा विचार मुळींच पसंत नव्हता. समरभटाचें मन वळविण्याचा त्यानें खूप प्रयत्न करून पाहिला. पण पालथ्या घागरीवर पाणी! शेवटीं शंखदूतानें भीमभटाची भेट घेऊन, समरभटाचा बेत त्याच्या कानीं घातला. तेव्हांपासून भीमभट अधिक सावध राहूं लागला.

● ● ●

## उमद्या घोड्याचा सौदा व समरभटाला जीवदान

एके दिवशीं मणिदत्त नांवाच्या एका व्यापाऱ्यानें एक सुलक्षणी व अत्यंत उमदा घोडा विकण्यासाठीं आणला होता. शंखदत्तानें ती गोष्ट भीमभटाला सांगितली. घोडा पहातांक्षणींच तो विकत घ्यायचा, असें भीमभटानें ठरविलें व त्याप्रमाणें तो त्या व्यापाऱ्याशीं सौदा करूं लागला. त्या उमद्या घोड्याची कीर्ति समरभटाच्याहि कानीं गेली होती. भीमभट तो घोडा घेण्याचा सौदा करीत आहे असें कळतांच, समरभट तेथें आला व त्या व्यापाऱ्याला म्हणाला, "मी तुला या घोड्याच्या किमतीच्या

दुप्पट रक्कम द्यायला तयार आहें. तेव्हां तो तूं मला दे." पण मणिदत्तानें सौदा नुकताच पुरा केला होता. त्यामुळें समरभटाचें म्हणणें मान्य करणें त्याला शक्य नव्हतें.

क्षणापूर्वींच तो घोडा भीमभटाला विकल्याचें त्यानें सांगतांच, सत्ता व संपत्ति यांनीं मदांध झालेल्या समरभटाला अत्यंत राग आला. तो आपल्या सेवकांना म्हणाला, "अरे बघतां काय ? सरळ व्यवहारानें हा घोडा मिळत नसेल, तर पकडा याचा लगाम आणि चला घेऊन याला आपल्या वाड्यांत." सेवक केवळ हुकुमाचे ताबेदार ! घोडा पकडण्यासाठीं ते पुढें झाले. तें पाहून भीमभट गरजला, "खबरदार एक पाऊल पुढें टाकाल तर ! घोडा माझा आहे. याच्या केंसालाहि हात लावाल तर मुडदा पाडीन एकेकाचा. चला व्हा मागें."

त्याचे हे शब्द ऐकून पुढें जायला कोणीहि धजेना. तें पाहून समरभटाच्या अंगाचा तिळपापड होऊं लागला. स्वतःच पुढें होऊन तो आपल्या सेवकांना म्हणाला, "नेभळटांनो शुंभासारखें नुसतें ऐकून काय घेतां ? मला विरोध करणाऱ्या या उद्धटाच्या आधीं मुसक्या बांधा आणि याच घोड्यावर त्याला घालून घेऊन चला माझ्याबरोबर ! तुमची छाती नसेल तर मीच घेतों याचा समाचार." असें म्हणून तो भीमभटावर चालून गेला. त्याचे सेवकहि त्याच्या मदतीला गेले. भीमभट एकटा पडलेला पाहून शंखदत्त त्याच्या मदतीला गेला. दोघांनीं समरभटाच्या अनेक सेवकांना लोळविलें व भीमभटानें समरभटालाहि चांगलाच हात दाखविला. समरभटाच्या इतर सेवकांनीं प्राण वांचविण्यासाठीं तेथून काढता पाय घेतला. तें पाहून 'आतां आपला निभाव लागणार नाहीं' या विचारानें जिवाच्या आशेनें समरभटहि पळून जाऊं लागला. शंखदत्ताला समरभटाचा फार राग आला होता. त्यानें समरभटाचा पाठलाग केला व केंस पकडून त्याला जमिनीवर लोळविलें. तो आतां समरभटाचा

शिरच्छेद करणार इतक्यांत भीमभटानें तेथें येऊन शंखदत्ताला त्या गोष्टी-पासून परावृत्त केलें. अशा रीतीनें भीमभटामुळेंच जीवदान मिळालेला जखमी समरभट धुळींतून उठला व तशाच स्थितींत त्यानें वडिलांचा महाल गांठला.

त्याच्या जखमांतून रक्त वहातच होतें. धुळीनें सर्व अंग माख-लेलें होतें. डोक्याचें केंस अस्ताव्यस्त झाले होते. शस्त्राच्या आघातांनीं अंगावरील वस्त्राच्या चिंध्या झाल्या होत्या. अशा स्थितींत समरभटाला पाहून राजा प्रथम गोंधळूनच गेला. नंतर त्यानें समरभटाच्या जखमांवर औषधोपचार करण्याची व्यवस्था करून सर्व गोष्टींची चौकशी केली. समर-भटानें तिखटमीठ लावून आपली बाजू रंगविली व भीमभटाच्याच माथीं दोष लादला. राजाला भीमभटाचा अत्यंत राग आला. त्याला चांगलीच अद्दल घडवून त्याचा कायमचा कांटा कसा काढून टाकावा या विचारांत त्यानें ती रात्र घालविली.

• • •

## देशान्तर करण्याची तयारी

दोन्ही राजपुत्रांच्या चकमकीची बातमी वाऱ्यासारखी शहरांत पसरली. 'राजा भीमभटाला काय शिक्षा करील' इकडे प्रजेचें लक्ष लागून राहिलें. पट्टराणी मनोरमा व प्रधान सुमति यांनीं भीमभटाला बोलावून घेतलें व सर्व घटनेची चौकशी केली. भीमभटाचा यांत कांहींच अपराध नव्हता. उलट त्यानेंच समरभटाचे प्राण वांचविले याची त्यांना खात्री पटली; पण 'चौकशी न करतां राजा भीमभटाला कदाचित् कैदेंत टाकील' या विचारानें ते गोंधळून गेले. त्यांनीं भीमभटाला रात्रींच्या रात्रीं पळून जाऊन पाटलीपुत्राचा रस्ता धरण्याचा सल्ला दिला.

भीमभट प्रथम त्या गोष्टीला तयार होईना. परंतु आईचा अत्यंत आग्रह पडल्यामुळें व तिनें आपल्या गळ्याची शपथ घातल्यामुळें अखेर

तो पाटलीपुत्राला जायला कबूल झाला. शंखभटालाहि त्यानें आपल्या-बरोबर घेतलें. आईनें आग्रहानें दिलेल्या सुवर्णमोहरा, रत्नें व जडजवाहीर घेऊन तो नवीन विकत घेतलेल्या घोड्यावर स्वार झाला. शंखदत्तहि दुसऱ्या एका जातिवंत घोड्यावर आरूढ होऊन त्याच्याबरोबर निघाला. राणी मनोरमेनें भरल्या डोळ्यांनीं दोघांना आशीर्वाद दिला व ते दोघे रातोरात राजधानी सोडून प्रवासास लागले.

• • •

**अरण्यांतील प्राणसंकट**

मध्यरात्रींपर्यंत त्यांनीं बराच मार्ग काटला व ते एका घनदाट जंगलामध्यें आले. चांदण्यांच्या अंधुक प्रकाशांत ते दोघे आपला मार्ग आक्रमीत असतां, घोड्यांच्या टापांमुळें होणाऱ्या आवाजानें सिंहाच्या एका जोडप्याला त्यांची चाहूल लागली. गर्जना करीत त्यांनीं भीमभट व शंखदत्त यांच्यावर हल्ला चढविला. त्यांचे छावेहि यांच्यावर तुटून पडले. दोघांनींहि आपल्या खड्गांनीं त्या सर्वांचा प्रतिकार केला. पण त्या सिंहांनीं आपल्या तीक्ष्ण पंजांच्या प्रहारांनीं त्यांच्या घोड्यांना जखमी केलें. त्या झटापटींत या दोघांनीं सिंहाना ठार केलें व घोड्यांना झालेल्या जखमा पहाण्यासाठीं ते खालीं उतरले. घोडे इतके भयंकर जखमी झाले होते कीं त्यांना पुढें पाऊल टाकण्याची शक्ति उरली नव्हती. कांहीं उपचार करण्यापूर्वींच दोन्हीहि घोडे धाडकन् जमिनीवर कोसळले व तडफडत गतप्राण झाले. मरणाच्या वेळची त्यांची तडफड यांना पहावेना. ज्या घोड्यासाठीं भीमभटानें समरभटाला खडे चारले व त्याचा परिणाम म्हणून घरादाराचा त्याग करून तो देशान्तराला जायला निघाला, तो घोडा चोवीस तासांच्या आंत मृत्युमुखीं पडलेला पाहून, भीमभटाला अत्यंत वाईट वाटलें.

त्यांची शेवटची तडफड तर भीमभटाला पहावेना. त्यानें आपले डोळे घट्ट मिटून घेतले व उफाळून येणारा शोकाचा उमाळा कसाबसा आवरला. त्याची ती अवस्था पाहून शंखदत्त त्याला म्हणाला; " महाराज, दुष्ट दैव आपल्या पाठीशीं हात धुवून लागलें आहे. ज्याच्यासाठीं आपणाला आपल्या घरादारावर तुळशीपत्र ठेवण्याची पाळी आली त्या या घोड्याला निर्घृण काळानें अशा रीतीनें हिरावून नेलें खरें, पण आतां शोक करीत बसण्याची ही वेळ नाहीं. कांहीं झालें तरी या प्रतिकूल स्थितीला आपल्याला धैर्यानें तोंड दिलेंच पाहिजे. या रात्रींतून आपल्याला शक्य तितक्या दूर गेलें पाहिजे." असें म्हणून शंखदत्तानें त्याला परिस्थितीची जाणीव करून दिली. नंतर तशा रात्रीं ते खाचखळग्यांतून अडखळत, ठेचाळत पुढें चालले व सूर्योदयाच्या सुमारास श्वापदांनीं भरलेल्या त्या दुर्गम अरण्यांतून ते सुखरूपपणें बाहेर पडले. शंखदत्तानें सुटकेचा निःश्वास सोडला.

• • •

**गंगापार होण्यांतील अडचण**

सूर्योदयाच्या वेळीं ते गंगेच्या पवित्र तीरावर येऊन पोहोंचले. गंगेच्या स्वच्छ व थंड पाण्यांत स्नान करून त्यांनीं रात्रींच्या प्रवासाचा शीण घालविला. पुनः ताजेतवाने होऊन ते मार्ग आक्रमूं लागले. फार भूक लागल्यामुळें वनांतील फळें व कंदमुळें यांवर भूक भागवावी या विचारानें शंखदत्त फळें शोधूं लागला. त्या वेळीं दोन भिल्ल शिकार करून त्या बाजूनें चाललेले त्याला दिसले. शंखदत्तानें त्यांच्याजवळचें मांस विकत घेतलें. फोफाट्यांत तें भाजलें व त्या दोघांनीं त्याच्यावर यथेच्छ ताव मारून गंगेच्या मधुर पाण्यानें आपली तहान भागविली. अशा रीतीनें सकाळची न्याहरी उरकून, गंगापार होण्यासाठीं ते ताजेतवानें झाले खरे. पण दुथडी भरून वाहणाऱ्या गंगेला उतार कोठेंच नव्हता. त्या भागांत

एकहि होडी किंवा नाव गंगेच्या प्रवाहांत त्यांना दिसली नाहीं. म्हणून गंगेच्या कांठाकांठानें नावेचा शोध करीत ते पुढें जाऊं लागले.

● ● ●

## श्रीकंठाला सर्वस्वदान

बरेच दूरवर गेल्यावर निर्जन प्रदेशांतील एक पर्णशाला त्यांच्या दृष्टीस पडली. त्या पर्णशालेच्या अंगणांत एक तरुण व तेजस्वी ब्राह्मण-कुमार वेदाध्ययन करीत बसलेला त्यांना दिसला. निर्जन वनांत त्याला एकट्यालाच पाहून त्यांना थोडें आश्चर्य वाटलें. त्याच्याजवळ येऊन त्यांनीं त्याची आस्थापूर्वक चौकशी केली. तेव्हां तो म्हणाला, " वाराणसी नगरींत नीलकण्ठ नांवाचे एक विद्वान् वैदिक होऊन गेले. त्यांचा मी श्रीकण्ठ नांवाचा एकुलता एक मुलगा. माझें शिक्षण व्यवस्थित व्हावें म्हणून लहानपणींच मला माझ्या वडिलांनीं गुरुकुलांत ठेवलें. बारा वर्षें अध्ययन करून आचार्यांची अनुमति घेऊन मी अत्यंत उत्सुकतेनें घरीं यायला निघालों तेव्हां माझ्या मातापित्यांवर निर्घृण काळानें घाला घातल्याचें मला वाटेंतच समजलें. ज्या आशेनें मी घरीं निघालों होतों ती आशा अशा रीतीनें करपून गेल्यानें, मी निराधार होऊन भटकूं लागलों. मला कोणींच थारा देईना. द्रव्याची ऊब नसल्यामुळें मला कोणींहि विचारीना. अशा स्थितींत गृहस्थाश्रमाचा विचार मला सोडून द्यावा लागला. संसारांत पडण्यापूर्वींच मला त्याचा वीट आला. मी येथें येऊन गंगामाईची उपासना सुरू केली.

माझ्या उपासनेनें प्रसन्न होऊन गंगामातेनें मला स्वप्नांत दर्शन दिलें व कांहीं फळें देत ती मला म्हणाली, " बाळा ! तुझ्या उपासनेनें मी प्रसन्न झालें आहें. हीं फळें घेऊन तूं येथेंच कांहीं दिवस रहा. लवकरच तुझे मनोरथ पूर्ण होतील." असें म्हणून खळखळ असा आवाज करीत गंगामाता अदृश्य झाली व त्या आवाजानें मी जागा झालों. मला तें सर्व

स्वप्न आठवलें. दुसरे दिवशीं सकाळीं मी स्नानासाठीं गंगेंत उतरलों. स्नान आवरून बाहेर पडणार तोंच गंगेच्या प्रवाहांत कांहीं फळें मला दिसलीं. अमृताप्रमाणें अत्यंत गोड अशीं फळें अजूनहि रोज मला मिळतात. त्यांच्यावरच उदरनिर्वाह करून मी गंगामाईच्या उपासनेंत दिवस काढीत असतों. गंगामातेनें सांगितलेला भाग्याचा दिवस कधीं उजाडणार आहे कोण जाणें !" असें म्हणून त्यानें एक दीर्घ उसासा टाकला.

त्याचें तें निराशामय जीवन पाहून भीमभटाचें हृदय दयेनें द्रवलें. शंखदत्ताच्या संमतीनें त्यानें आपल्याजवळचें सर्व धन त्या ब्राह्मणकुमाराला दिलें व तो म्हणाला, "मित्रा ! असा निराश होऊं नको. तुझा तो भाग्याचा दिवस आजच उजाडला आहे. या मोहरा आणि हीं रत्नें तुझ्या ताब्यांत घे व आजपासूनच तूं आपल्या गृहस्थाश्रमाच्या तयारीला लाग." इतकें बोलून त्यानें त्या ब्राह्मणकुमाराचा आशीर्वाद घेतला व तो शंखदत्तासह पुढील मार्ग आक्रमूं लागला.

गंगेच्या तीरावरून बरेंच अंतर तोडलें तरी त्यांना गंगापार होण्याला कांहींच साधन मिळालें नाहीं. तेव्हां शेवटीं आपल्या बाहुबलावर भिस्त ठेवून पोहत पोहत पलीकडे जायचें असें त्यांनीं ठरविलें व आपलीं खड्गें आपापल्या मस्तकावर बांधून त्या दोघांनीं गंगेच्या विशाल पात्रांत उड्या टाकल्या.

• • •

## मित्राचा वियोग व मंत्राची प्राप्ति

गंगेचें पात्र खूपच विस्तीर्ण होतें. पाणी खूप खोल असलें तरी प्रवाहाचा वेग कांहीं कमी नव्हता. भीमभट व शंखदत्त हे दोघेहि प्रवाहाच्या मध्यापर्यंत बरोबरच होते. पण मध्यावर आल्यानंतर मात्र प्रवाहाच्या भयंकर वेगामुळें त्या दोघांमध्यें बरेंच अंतर पडत गेलें. कांहीं

वेळानें तर ते एकमेकांना दिसेनात देखील. तेव्हां मात्र भीमभटाचे हातपाय लटपटूं लागले. शेवटीं लाटा नेतील तिकडे जात तो कसाबसा पलीकडच्या तीरावर जाऊन पोहोंचला.

तीरावर उभा राहून, त्यानें गंगेच्या त्या अथांग प्रवाहांत खूप लांब-वर दृष्टि टाकली. पण शंखदत्त कोठें दिसेना. तेव्हां मात्र त्याचें धैर्य सर्वस्वीं खचलें. दुर्दैवानें त्याचा अगदीं पिच्छाच पुरविला होता. संकट-कालीं साहाय्य करणारा तो एकुलता एक मित्रहि दुर्दैवानें हिरावून नेला. तो आतां खरोखरी पोरका झाला. मित्रविरहाचें दुःख त्याला असह्य झालें. 'गंगेंत आत्मार्पण करून आपण कायमचें दुःखमुक्त व पापमुक्त व्हावें' असा त्यानें निश्चय केला व गंगेच्या कांठीं उभा राहून तो तिला म्हणाला, "गंगामाते ! माझे बहिश्चर प्राण असलेल्या माझ्या मित्राला तूं माझ्यापासून ओढून नेलेंस. मग हा माझा शून्य देह घेऊन मला काय करायचें आहे ? तोहि तूं आतां आपल्या पोटांत घे." असें म्हणून गंगेंत जलसमाधि घेण्याच्या निश्चयानें तो प्रवाहांत उडी घेणार तोंच साक्षात् गंगामाता प्रवाहांतून वर आली व त्याला म्हणाली, "बाळा ! तूं हें साहस करूं नकोस. तुझा मित्र जिवंत आहे. लवकरच त्याची व तुझी भेट होईल. तुझें हें मित्रप्रेम पाहून मी तुझ्या-वर प्रसन्न झालें आहें. माझ्या कृपेनें तुला एक अद्‌भुत विद्या प्राप्त होईल. तिच्या मंत्रांत सातच अक्षरें आहेत. असलेल्या क्रमानें तीं उच्चारलीं असतां तो अनुलोम मंत्र होतो. हा अनुलोम मंत्र उच्चारतांच तुला अदृश्य होतां येईल. या मंत्रांतील अक्षरें उलट्या क्रमानें उच्चारलीं असतां तो प्रतिलोम मंत्र होतो. या प्रतिलोम मंत्रामुळें तुला हवें तें रूप धारण करतां येईल. या विद्येला 'प्रतिलोमानुलोम' म्हणतात. हिच्या साहाय्यानें तूं पृथ्वीवरील सार्वभौम राजा होशील." असें म्हणून गंगामाता अदृश्य झाली.

● ● ●

## द्यूतशाळेंतील विजय

तिच्या आश्वासनामुळें भीमभटाच्या आशांना पुन्हां पालवी फुटली. मोठ्या उत्साहानें व उत्कंठेनें तो शंखदत्ताचा शोध करूं लागला. मित्राला शोधीत शोधीत तो 'लाट' देशांत येऊन पोहोंचला. तो देश म्हणजे सर्व विद्यांचें व कलांचें माहेघरच होतें. तेथील धर्मशील व सदाचारी लोकांचा आदरसत्कार स्वीकारीत तो राजधानींत आला. तेथील भव्य प्रासाद व उत्तुंग मंदिरें पहात पहात तो एका द्यूतशालेंत आला. तेथें बरेच जुगारी द्यूत खेळत असलेले त्याला दिसले. भीमभटानें त्यांना आपला परिचय करून दिला. हें नवीन सावज बरें सांपडलें आहे, या कल्पनेनें त्या जुगाऱ्यांना आनंद वाटत होता. पण त्यांचा अंदाज साफ चुकीचा ठरला. त्यांनीं अनेकांना लुबाडून, खूप कमाई करून ठेविली होती. पण द्यूत-कलेंत निष्णात असलेल्या भीमभटानें हां हां म्हणतां त्यांना जिंकलें व त्यांची सर्व कमाई हिरावून घेतली.

• • •

## दिलदार स्वभावाचें फळ

'नवीन सावजाला' जाळ्यांत पकडूं पहाणाऱ्या त्या द्यूतकारांचीच शिकार करून भीमभटानें त्यांना जेरीस आणलें. आपलें सर्वस्व गमावल्यानें त्या सर्वांनाच अत्यंत दुःख झालें. जड अंतःकरणानें ते घरीं निघाले असतां भीमभट दारावर आला व त्यांना थांबवून म्हणाला, "मित्रांनो! कोठें जातां? आधीं हें तुमचें धन घ्या व मग येथून जा. मला तें घेऊन काय करायचें आहे?" त्याचे ते शब्द ऐकून त्या सर्व द्यूतकारांना आश्चर्याचा धक्काच बसला. पण द्यूतांतील नियमाप्रमाणें जिंकल्या गेलेल्या धनाला स्पर्श करणें, म्हणजे देखील पाप समजलें जाई. त्यामुळें त्यांच्यापैकीं एकहि जुगारी त्या धनाला हात लावायला तयार नव्हता. तेव्हां भीमभट त्यांना म्हणाला, "मित्रहो! द्यूतांत हरलेलें हें

द्रव्य परत घेण्यास तुम्हांला संकोच वाटत आहे हें उघड दिसतें. पण हें धन जिंकून मी याचा विनियोग माझ्या इष्टमित्रांसाठींच करणार ना ? पण पहिल्याच भेटींत माझ्याशीं आपुलकीनें वागणाऱ्या तुम्हांलाच, मी माझे इष्टमित्र समजतों. तेव्हां या धनावर तुमचा अधिकारच आहे."

भीमभटाचें तें आग्रहाचें बोलणें ऐकून अक्षक्षपणक नांवाचा एक जुगारी पुढें आला व त्यानें आपल्या मित्रांना भीमभटाची विनंति मान्य करण्यास सांगितलें. भीमभटानें आपल्या निःस्वार्थी व दिलदार वृत्तीनें सर्वांचीं अंतःकरणें जिंकलीं होतीं. त्यांनीं भीमभटाचें म्हणणें एका अटीवर मान्य केलें. ती अट म्हणजे भीमभटानें त्यांच्याशीं कायमची मैत्री जोडायची ! भीमभटानें त्यांना कायमच्या मैत्रीचें आश्वासन दिलें, तेव्हां त्यांनीं आपलें धन परत घेतलें.

● ● ●

## मृत्यूच्या दाढेंतून शंखदत्ताची मुक्तता

थोड्याच दिवसांत पावसाळ्यास सुरुवात झाली. वादळी वाऱ्यांनीं समुद्रावर थैमान घातलें. एका प्रचंड वादळांत समुद्राच्या पाण्याचा लोट 'विपाशा' नदीच्या मुखांतून प्रवाहांत शिरला. त्यामुळें ती नदी उलट मार्गानें वाहूं लागली. तें दृश्य अगदीं अपूर्व होतें. विपाशा नदीच्या दोन्ही तीरांवर पाणीच पाणी झालें. राजधानी पाण्याखालीं बुडते कीं काय, अशी लोकांना भीति वाटूं लागली.

पण सुदैवानें तें वादळ लवकरच शमलें व नदीचें वाढलेलें पाणी ओसरूं लागलें. त्या धामधुमींत समुद्रांतील एक प्रचंड मासा तीरावर अडकून पडला. तें पाहून कोळ्यांनीं त्याला गराडा घातला व तीक्ष्ण शस्त्रांनीं त्याचें पोट फाडलें. तेव्हां त्याच्या पोटांतून एक माणूस अकल्पितपणें बाहेर आला. तो जिवंत असलेला पाहून सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला. ती वार्ता नगरींत वाऱ्यासारखी पसरली. तो

मासा आणि माशाच्या पोटांतून सुखरूप जिवंत बाहेर पडलेला तो माणूस यांना पहाण्यासाठीं तेथें लोकांची नुसती झुंबड उडाली.

भीमभटाहि ती अद्‌भुत घटना पहाण्यासाठीं आपल्या मित्रांसह तेथें आला. तिथलें तें दृश्य पाहून त्याचा स्वतःच्या डोळ्यांवर विश्वास बसेना. माशाच्या पोटांतून बाहेर पडलेला दुसरा-तिसरा कोणी नसून शंखदत्तच होता. भीमभटाला रहावलें नाहीं. हर्षानें धांवत जाऊन त्यानें मित्राला मिठीच मारली व आनंदाश्रूंनींच त्याला स्नान घातलें. प्राण-संकटांतून वांचलेल्या शंखदत्तालाहि भीमभटाच्या भेटीमुळें आनंदाचें भरतें आलें.

भावनांचा आवेग ओसरल्यावर त्यांनीं एकमेकांची चौकशी केली. तेव्हां शंखदत्त त्याला म्हणाला, "महाराज ! गंगेच्या मध्यावर आल्यानंतर मी धारेला लागलों. जिवापाड धडपडलों पण पैलतीर गांठतां आलें नाहीं. इतक्यांत एका प्रचंड माशानें मला गिळून टाकलें. 'आपली घटका भरली' अशी त्या वेळीं माझी खात्री झाली. क्षणार्धांत मी माशाच्या पोटांत गेलों. तेथें त्याच्या पोटांत खूप मोठी पोकळी होती. एखाद्या खोलींत रहावें त्याप्रमाणें मी तेथें राहूं लागलों. भूक लागली कीं आपल्या कट्यारीनें त्याच्या पोटांतील मांस कापावें व त्यावर आपली भूक भागवावी असा माझा क्रम चालू असे. मात्र त्याच्या पोटांतून बाहेर पडण्याचा मार्ग मला मिळेना. नंतर तो मासा गंगेच्या प्रवाहांतून समुद्रांत आला असावा व समुद्राच्या प्रवाहांतून तो या नदींत शिरला असावा. तें कांहीं असलें तरी माझ्या सुदैवानें मी आज या ठिकाणीं येऊन पडलों खरा."

शंखदत्ताची ती हकीगत ऐकून दैवाच्या अद्‌भुत लीलेचें लोकांना कौतुक वाटलें. नंतर भीमभटानें शंखदत्तास आपल्याबरोबर नेलें. त्याची योग्य ती काळजी घेतली. त्याला स्वच्छ पाण्यानें स्नान घालून त्याला

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय
जा. क्र. ... ता. दि.

वापरण्यासाठीं उंची वस्त्रें दिलीं. जेवण-खाण व्यवस्थित झाल्यावर मग तो दिवस दोघांनीं गप्पागोष्टींतच घालविला.

• • •

## राजकन्या कुवलयावली

पुढें शंखदत्तहि भीमभटासह त्या नगरींत पुढील वेत रचीत राहूं लागला. एकदां नागराज वासुकीचा मोठा उत्सव त्या नगरींत सुरू झाला. तो पहाण्यासाठीं भीमभट शंखदत्तासह वासुकीच्या मंदिराकडे आला. वासुकीचें दर्शन घेऊन संचार करीत करीत भीमभट एका सरोवरापाशीं आला. त्या वेळीं त्या सरोवरांत आपल्या मैत्रिणींसह जलक्रीडा करीत असलेली एक सुंदर तरुणी त्याच्या दृष्टीस पडली. तेथें असलेल्या पहारेकऱ्यांनीं त्याला व त्याच्या मित्रांना पुढें जाण्यास बंदी केली. तेव्हां "सार्वजनिक ठिकाणीं फिरायला बंदी करणारा तूं कोण?" असें म्हणून शंखदत्तानें त्या पहारेकऱ्याला दटावलें. पहारेकरी म्हणाला, "कुवलयावली राजकन्या जलक्रीडा करीत आहे. इकडे कोणालाहि फिरकूं देऊं नकोस असा मला सक्त हुकूम आहे." अशा रीतीनें पहारेकरी त्यांची समजूत घालीत असतां राजकन्या कुवलयावलीचें लक्ष तिकडे गेलें. भीमभटाच्या पाणीदार व तेजस्वी नेत्रांनीं तिचें अंतःकरण काबीज केलें. टक लावून ती त्याच्याकडे पहात राहिली. शेवटीं तिला रहावलें नाहीं. तो कोण आहे हें जाणून घेण्याच्या इच्छेनें तिनें हंसावली नांवाच्या एका कुशल दासीला एकीकडे बोलावून त्याच्याकडे पाठविलें. कुवलयावलीच्या त्या भावपूर्ण दृष्टिक्षेपानें भीमभट मोहून गेला होता. तो आपल्याच तंद्रींत असतांना कांहीं तरी निमित्त काढून आलेल्या हंसावलीनें भीमभटाच्या मित्राकडून त्याच्याबद्दलची इत्थंभूत माहिती मिळविली व ती कुवलयावलीच्या कानांत सांगितली. ती ऐकून भीमभटाशीं आपली ओळख व्हावी अशी तीव्र इच्छा तिच्या मनांत उत्पन्न झाली. पण ती पूर्ण होणार कशी? कुवलयावली आपली

जलक्रीडा आवरून वर येईपर्यंत भीमभट व त्याचे मित्र उद्यान-शोभा पहात दुसरीकडे निघून गेले. पण त्यावेळेपासून भीमभटाचें लक्ष कोणत्याच गोष्टींत लागेना. ही गोष्ट इतरांच्याहि लक्षांत येऊन चुकली.

● ● ●

## कुवलयावलीला भेटीचं आश्वासन

कुवलयावलीची भेट घ्यावी असें भीमभटाच्याहि मनांत होतेंच. म्हणून आपले मित्र पुढें जात असतांना, तो मात्र कांहीं तरी निमित्तानें मागें मागें रेंगाळत राहिला. तो एकटाच आहे असें पाहून हंसावली त्याच्याजवळ आली व कुवलयावलीच्या त्याच्यावरील प्रेमाची तिनें त्याला कल्पना करून दिली. कुवलयावलीकडून प्रेमाची ग्वाही मिळतांच भीमभटाला अत्यानंद झाला. त्याच दिवशीं संधि साधून कुवलयावलीच्या भेटीला जाण्याचें भीमभटानें कबूल केलें.

हंसावलीनें ती आनंदाची बातमी कुवलयावलीला सांगतांच तिचा चेहरा खुलला. या ना त्या निमित्तानें हंसावलीखेरीज सर्व दासींना तिनें त्या दिवशीं आपल्या महालांतून बाहेर पाठविलें. भीमभटानें आपल्या येण्याची निश्चित वेळ न दिल्यामुळें त्या दोघी त्याच्या वाटेकडे डोळे लावून बसल्या. परंतु सूर्यास्त होऊन गेला तरी त्याचा पत्ता नव्हता. त्यामुळें हंसावलीचा उत्साह पार मावळला. सूर्यास्तानंतर राजवाड्यांतील कडक पहाऱ्यांतून आंत येणें तिऱ्हाइताला मुळींच शक्य नव्हतें. त्यामुळें खिन्न होऊन राजकन्या बसली होती. इतक्यांत गंगामातेनें दिलेल्या अनुलोम मंत्राच्या सामर्थ्यानें अदृश्य झालेला भीमभट कोणाच्याहि दृष्टीस न पडतां त्या सर्व कडक पहाऱ्यांतूनहि कुवलयावलीच्या महालांत येऊन उभा राहिला. तेथें देखील कांहीं क्षण अदृश्य राहूनच तो त्या दोघींमधील संवाद ऐकत होता. त्या संवादावरून कुवलयावलीच्या आपल्यावरील उत्कट

प्रेमाची त्याला कल्पना आली. स्वतःला धन्य समजून त्यानें प्रतिलोम मंत्र उच्चारला व तो तेथें एकदम प्रकट झाला.

● ● ●

## कुवलयावलीशीं गांधर्व विवाह

त्याला आपल्या महालांत अचानक आलेला पाहून कुवलयावली गोंधळून गेली. तिची ती गोंधळलेली अवस्था पाहून भीमभट आपण होऊनच एका आसनावर बसला व तिलाहि बसायला सांगून त्यानें स्वतः होऊन तिच्याशीं बोलायला सुरुवात केली. कांहीं वेळानें कुवलयावलीचा संकोच व भीति हीं कमी झालीं. त्यांनीं एकमेकांचीं अंतःकरणें एकमेकांपुढें खुली केलीं. भीमभटानें गांधर्वविधीनें तिच्याशीं विवाह केला. नंतर गप्पा-गोष्टींत बराच वेळ घालवून व पुनः भेटीचें आश्वासन देऊन भीमभट बसल्या ठिकाणींच एकाएकीं अदृश्य झाला. त्याचें तें मंत्रसामर्थ्य पाहून कुवलयावली आश्चर्यानें थक्क झाली.

त्यानंतर संकेताप्रमाणें भीमभट अदृश्य रूपानें नेहमीं तिच्या अन्तःपुरांत येत असे आणि तासन् तास तिच्याशीं गप्पागोष्टी करून पुनः आपल्या निवासस्थानीं निघून जात असे. त्याच्याशीं गांधर्वविधीनें विवाह केल्यापासून कुवलयावलीच्या वागणुकींत मोठाच फरक पडला. वृद्ध कंचुकीच्या बारीक नजरेंतून तो निसटला नाहीं. त्याला सारखी शंका येई. पण कुवलयावली कोठें बाहेर जात नसे किंवा तिच्याकडे कोणी येत असल्याचेंहि त्याला दिसून येत नसे. त्यामुळें त्याला कांहीं अनुमान काढतां येईना. शेवटीं त्यानें आपली शंका चंद्रादित्य राजाला बोलून दाखविली. त्या गोष्टीचा छडा लावण्यासाठीं राजानें आपल्या दोन गुप्त हेरांची त्या कामीं योजना केली.

● ● ●

## चंद्रादित्य राजाचा भीमभटाला निरोप

वेळीं अवेळीं, वेषांतर करून, कांहीं ना कांहीं निमित्त काढून त्या हेरांनीं अंतःपुरांत आपलें जाणेंयेणें ठेवलें. पण त्यांना कांहीं पत्ता लागेना. एके दिवशीं कानोसा घेत राजकन्येच्या महालाजवळ ते उभे असतां, एकदम महालाचें दार बंद झालें व खालच्या आवाजांत राजकन्या कोणाशीं तरी संभाषण करीत आहे असें त्यांना वाटलें. त्यांनीं दाराच्या बारीक फटींतून डोकावून पाहिलें, पण त्यांना कोणीं दिसलें नाहीं. नंतर दाराला कान लावून त्यांनीं त्या संभाषणाचा कानोसा घेतला. त्यांत पुरुषाचा आवाज त्यांना स्पष्ट ऐकूं येत होता. पाळत ठेवून त्याला पकडायचें असें ठरवून ते दोन हेर तेथेंच बसून राहिले. तास झाला, दोन तास झाले; पण बाहेर कोणी पडलें नाहीं. नंतर थोड्या वेळानें महालाचें दार उघडलें गेलें. आतां सावज आपल्या तावडींत सांपडणार या खात्रीनें ते टपून बसले. पण त्यांची निराशा झाली. अदृश्य रूपानें भीमभट केव्हांच पसार झाला !

शेवटीं त्यांनीं घडलेली हकीगत राजाला सांगितली. ती ऐकून राजाला मोठें आश्चर्य वाटलें. आपल्या मुलीच्या भेटीला येणारा हा पुरुष कोणी तरी सिद्ध किंवा विद्याधर असावा, असें राजाला वाटलें. कुवलयावली अनुरूप वराचीच निवड करील अशी त्याची खात्री असल्यामुळें त्या बाबतींत तो निःशंक होता. म्हणून तो आपल्या हेरांना म्हणाला, " माझ्या कन्येचें मन मोहून टाकणारा तो सिद्ध पुरुष उद्यां तिच्या महालांत आला तर तुम्ही त्याच्याशीं अत्यंत सौजन्यानें वागा. कुवलयावलीच्या महालांत तो असतांना तुम्ही तेथें जाण्याचा प्रयत्न कराल तर तो एकदम अदृश्य होईल व आपल्याला कांहींच करतां येणार नाहीं. तरी तुम्ही महालाबाहेरच उभे राहून त्याला माझा निरोप कळवा कीं, " हे भाग्यवान् पुरुषा ! तूं माझ्याकडे समक्ष येऊन कुवलयावलीबद्दल मागणी कां घातली

नाहींस ? तुझ्यासारखा गुणवान् वर माझ्या कन्येला लाभला तर मला केव्हांहि आनंदच होईल. तेव्हां या बाबतींत तूं मला भेटावेंस अशी माझी इच्छा आहे. हा माझा निरोप देऊन तुम्ही त्याला इकडे घेऊन या. " असें म्हणून राजानें आपल्या हेरांना जायला परवानगी दिली.

दुसरे दिवशीं रात्रीं ते हेर कुवलयावलीच्या महालाबाहेर उभे राहिले. आंतून पुरुषाचा आवाज ऐकूं येतो हें पाहून बाहेरूनच त्यांनीं राजाचा निरोप त्याला सांगितला. तो ऐकून आपल्या येथील येण्याची चाहूल राजाला लागली आहे याची भीमभटाला कल्पना आली. तरी देखील मुळींच न डगमगतां हेरांना उद्देशून तो म्हणाला, " मित्रांनो ! तुम्ही चंद्रादित्य महाराजांना असें कळवा कीं, आतां रात्रींची वेळ असल्यामुळें उद्यां सकाळीं मी आपणांकडे येईन व स्वतः सर्व हकीगत आपणांस निवेदन करीन. "

भीमभट नेहमींप्रमाणें अदृश्य होऊन कुवलयावलीच्या महालांतून बाहेर पडून आपल्या मित्रांकडे आला व घडलेली सर्व हकीगत निवेदन करून राजाचा निरोप त्यानें सर्वांना सांगितला. त्यानें आपल्या सातहि मित्रांना, उंचीं वस्त्रें धारण करून आपल्याबरोबर राजसभेंत येण्याची विनंति केली.

• • •

## मित्रांसह राजसभेंत आगमन

दुसरे दिवशीं भीमभट स्वतः भरजरी वस्त्रें परिधान करून व रत्न-जडित अलंकार घालून आपल्या मित्रांसह राजसभेंत आला. त्याच्या चेहऱ्यावरील तेजानें व सौंदर्यादि गुणांनीं सर्व सभाजन विस्मित झाले. चंद्रादित्य राजानें आसनावरून उतरून त्याचें स्वागत केलें व त्याला एका उंच आसनावर नेऊन बसविलें. त्याचे मित्रहि आपापल्या आसनांवर बसले. नंतर भीमभटाचा परिचय करून देण्यासाठीं शंखदत्त उठून उभा

राहिला व चंद्रादित्याला नम्रपणें म्हणाला, "महाराज ! राढा नगरीचे राजे उग्रभट यांचा हा ज्येष्ठ पुत्र आहे. याचें नांव भीमभट. शस्त्रास्त्रविद्यांत अद्वितीय असलेल्या या वीराला गंगेच्या प्रसादानें कांहीं सिद्धीहि प्राप्त झाल्या आहेत. आपल्या निमंत्रणावरून तो आपल्या कन्येचा स्वीकार करण्यासाठीं येथें आला आहे." अशा तऱ्हेनें भीमभटाचा सर्वांना परिचय झाल्यानंतर राजसभेंत अनेक विषयांवर चर्चा सुरू झाली. त्या वेळीं त्या विविध चर्चेंत भाग घेऊन भीमभटानें अनेक विषयांतील आपलें प्रभुत्व सर्वांच्या निदर्शनास आणलें.

● ● ●

## कुवलयावलीशीं विधिपूर्वक विवाह

चंद्रादित्यानें राजसभेंतच आपल्या मुलीच्या विवाहाची घोषणा केली व भीमभटाला कांहीं दिवस त्यानें आपल्याकडेच आग्रहपूर्वक ठेवून घेतलें. पुढें लवकरच एका शुभ मुहूर्तावर चंद्रादित्यानें आपल्या कन्येचा भीमभटाशीं यथाविधि विवाह लावला. त्या वेळीं चंद्रादित्यानें बराच मोठा फौजफाटा देऊन, एक मोठा प्रांतहि आंदण म्हणून त्याला बहाल केला. भीमभट आपल्या छोट्या प्रांताचें राज्य पहात तेथें कुवलयावलीच्या सहवासांत सुखानें राहूं लागला.

● ● ●

## भीमभटाला 'लाट' देशाचें राज्य

भीमभटानें आपल्या प्रांताचा राज्यकारभार अत्यंत चोख व समाधानकारक चालविलेला पाहून वृद्ध चंद्रादित्याला समाधान वाटलें. त्याला मुलगा नसल्यामुळें त्यानें मंत्र्यांना बोलावून घेऊन त्यांच्या सल्ल्यानें आपलें राज्य भीमभटाच्या हवालीं केलें. नंतर तो तपश्चर्येसाठीं वनांत निघून गेला. आपल्या मित्रांच्या साहाय्यानें भीमभटानें त्या मोठ्या राज्याची उत्तम व्यवस्था ठेविली. त्याला आतां कसलीहि कमतरता नव्हती

पण समरभटाच्या दुष्कृत्याबद्दल त्याच्यावर अजून सूड उगविण्यास संधि मिळाली नव्हती या गोष्टीची मात्र त्याच्या मनाला बरीच बोचणी लागून राहिली होती. तरी पण वडिलांनीं त्याला कशीहि वागणूक दिली असली तरी त्यांना दुखवावयाचें नाहीं या विचारानेंच तो इतके दिवस स्वस्थ होता.

• • •

## उग्रभटाचें देहावसान

एके दिवशीं त्यानें अशी वार्ता ऐकली कीं, उग्रभट तीर्थयात्रेसाठीं प्रयागास आला असतां, तेथेंच त्याला मृत्यू आला. चौकशी करून त्यानें या वार्तेबद्दल अधिक माहिती मिळविली; तेव्हां ती खरी असल्याचें कळून आलें. आपल्या मातेला वृद्धापकाळीं वैधव्य आलें याचें त्याला अत्यंत वाईट वाटलें. त्यानें आपल्या वडिलांचें और्ध्वदेहिक यथासांग केलें व समरभटाला कळविलें कीं, " आपल्या घराण्यांत आतांपर्यंत मोठ्या मुलाला राज्याचे अधिकार मिळण्याचा प्रघात आहे. त्या दृष्टीनें इतके दिवस बाबांनीं चालविलेलें राज्य न्यायानें व हक्कानें मलाच मिळालें पाहिजे. या राज्यावर एका नर्तकीच्या मुलाला हक्क सांगतां येणार नाहीं. तेव्हां तूं तें राज्य मुकाट्यानें माझ्या हवालीं कर नाहीं तर मरणास तयार हो ! "

• • •

## समरभटावर सूड उगवला

एका दूतानें आणलेला हा लेखी निरोप वाचून समरभटाच्या तळपायाची आग मस्तकाला पोहोंचली. तो रागानें थरथर कांपूं लागला. भीमभटाला राज्य देण्याचें साफ नाकारलें व त्याचें आव्हान स्वीकारलें. राज्याची सर्व सत्ता आतां आपल्या हातीं असल्यामुळें भीमभटाला आपण सहज चिरडून टाकूं, असा भलता आत्मविश्वास त्याला होता. इकडे भीमभटानेंहि मोठ्या युद्धाची तयारी चालविली. तें पाहून

समरभटाचे अनेक मांडलिक राजे आपण होऊन भीमभटाच्या पक्षाला येऊन मिळाले. समरभटाच्या राजवटीला कंटाळलेल्या सर्व प्रजेचा पाठिंबाहि भीमभटालाच होता.

प्रचंड सैन्यानिशीं भीमभट राढा नगरीवर चालून आला. समरभटहि मोठें सैन्य घेऊन लढण्यासाठीं नगरीबाहेर पडला. दोघांचीं सैन्यें एकमेकांना भिडलीं. तुंबळ युद्ध जुंपलें. धुळीच्या लोटांनीं आकाश व्याप्त झालें. संग्राम चालू असतां, शंखदत्त, चंडभोज इत्यादि भीमभटाच्या महारथी योद्ध्यांनीं शत्रुसैन्याच्या फळींत मोठें खिंडार पाडलें व शत्रुपक्षाची दाणादाण उडवून टाकली.

समरभटाचे सैनिक जीव मुठींत घेऊन पळत सुटले. तें पाहून रथावर आरूढ झालेला समरभट त्यांना धीर देण्यासाठीं आघाडीवर आला. त्याला पाहून भीमभटानें त्याच्या रथाचे घोडे मारून टाकले. तो दुसऱ्या रथावर आरूढ होऊन लढूं लागणार, तोंच भीमभटानें त्याचें धनुष्य तोडलें. तेव्हां समरभट प्रचंट गदा हातांत घेऊन भीमभटाच्या बाणांचा मारा चुकवीतच त्याच्या जवळ आला. त्यानें गदेच्या एकाच आघातानें भीमभटाच्या हत्तीचें गंडस्थळ फोडलें. त्यासरशी हत्तीचें तें प्रचंड धूड जमिनीवर धाडकन् कोसळलें. कोसळणाऱ्या हत्तीवरून स्वतःला कसाबसा सावरीत, भीमभटहि हातांत गदा घेऊन, त्याच्यावर चालून गेला. विद्येच्या प्रभावामुळें अदृश्य होऊन समरभटाचे प्रहार चुकविणें व त्याच्यावर प्रतिप्रहार करणें, भीमभटाला सहज शक्य होतें. पण त्या शूर वीरानें हा भ्याड मार्ग स्वीकारला नाहीं. गदायुद्धांत दोघांच्याहि गदा निकामी झालेल्या पाहून, प्रत्येकानें आपलें खड्ग उपसलें व ते एकमेकांवर तुटून पडले. शेवटीं भीमभटानें एका प्रहारांतच समरभटाचें मस्तक उडविलें व विजयश्रीला आपल्या पक्षाकडे खेंचून आणलें. सर्वांनीं भीमभटाचा जयजयकार केला. समरभटाचें उरलें सुरलें सैन्यहि भीमभटाला

शरण आलें. अशा रीतीनें कित्येक वर्षांची अपुरी इच्छा समरभटावर सूड उगवून भीमभटानें पूर्ण केली व आपल्या वाडवडिलार्जित सिंहासनावर तो आरूढ झाला. त्या आनंदाप्रीत्यर्थ सर्व राज्यांत आनंदोत्सव साजरा झाला.

● ● ●

## भीमभटाचा दिग्विजय

या आनंदमहोत्सवाच्या वेळीं भीमभटानें आपल्या उपकारकर्त्यांची आठवण ठेवून, त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें त्यांना खूप मोठ्या भेटी दिल्या. आपल्या प्राणापेक्षां प्रिय असलेल्या शंखदत्ताला त्यानें 'लाट' देशाचें राज्य दिलें. मदत करणाऱ्या इतर मित्रांना त्यानें मोठमोठ्या जहागिरी दिल्या व स्वतः वडिलांच्या राज्याचा कारभार पहात तो कुवलयावलीबरोबर सुखानें काळ कंठूं लागला. नंतर कांहीं काळानें आपलें प्रचंड सैन्य बरोबर घेऊन तो दिग्विजयासाठीं बाहेर पडला. त्याला प्रतिकार करण्याची कोणाचीच शक्ति नव्हती. त्यामुळें सर्व राजे आपण होऊन त्याला शरण आले. कांहींनीं त्याच्याशीं सोयरीक जुळविण्यासाठीं त्याला आपल्या सुंदर व सद्गुणी कन्या देऊं केल्या. अनुरूप राजकन्यांचा स्वीकार करून त्यानेंहि पुष्कळ राजघराण्यांशीं आपला घरोबा प्रस्थापित केला व त्या विशाल व निष्कंटक राज्याचा सुखानें आस्वाद घेत तो आपले दिवस आनंदांत घालवूं लागला.

● ● ●

## ऋषीचा शाप व भविष्यकथन

आपल्याला कोणीहि प्रतिस्पर्धी उरला नाहीं या विचारानें त्याचें राज्यकारभारांतील लक्ष कांहींसें कमी झालें. पुढें पुढें तर राज्याची सर्व जबाबदारी आपल्या मंत्र्यांवर सोंपवून तो आपला बहुतेक वेळ मद्यपान व शिकार यांत घालवूं लागला. त्याला आपल्या वैभवाची धुंदी चढली होती.

एकदा भीमभट प्रमाणाबाहेर मद्यपान करून, मद्याच्या धुंदींत

बेहोष होऊन पडला असतां, उत्तंक नांवाचा एक तपस्वी त्याच्या भेटीसाठीं आला. ऋषिमहाराज भेटीला आले असल्याचें सेवकानें भीमभटाला येऊन सांगितलें. पण दारूच्या धुंदींत असल्यानें तो सेवकावर खेकसला, "जा, चल, नीघ येथून आणि आलेल्या त्या दाढीवाल्या बोकडालाहि गचांडी देऊन हांकलून दे." राजाचें तें बरळणें उत्तंकानें ऐकलें. राजाच्या या वर्तणुकीचा त्याला अत्यंत राग आला व त्यानें राजाला शाप दिला, "मदांध होऊन तूं एका सत्त्वशील मुनीचा अशातऱ्हेनें अपमान करतोस, त्या अर्थीं मदानें अंध झालेल्या रानटी हत्तीच्या जन्माला तूं जाशील."

रागावलेल्या मुनीची ती शापवाणी ऐकतांच, राजा चपापला. त्याचे डोळे खाडकन् उघडले. तो महालांतून बाहेर आला व त्यानें मुनीचे पाय धरले. तो जेव्हां दीनवाणीनें मुनीची प्रार्थना करूं लागला, तेव्हां कोमल अंतःकरणाच्या मुनीचें हृदय द्रवलें. शांत पण तितक्याच निग्रही स्वरांत उत्तंक त्याला म्हणाला, "राजा! आतां पाय धरून काय उपयोग? माझे शब्द खोटे ठरणार नाहींत. मृगांकदत्त गंधर्वाचा प्रचंडशक्ति नांवाचा एक सचिव नागाच्या शापामुळें आंधळा बनून असहाय स्थितींत भटकत राहील. त्याला तूं जेव्हां मदत करशील तेव्हां तुझा हा शाप नष्ट होईल व तूं गंधर्व लोकाला जाशील."

भीमभटाला असें आश्वासन देऊन उत्तंक मुनि आल्या वाटेनें परत गेला. त्याच क्षणीं भीमभट राजाचें एका प्रचंड हत्तीमध्यें रूपांतर झालें. तें पाहून सेवक लोकांत गोंधळ माजला. त्यांनीं ती वार्ता मंत्र्यांना व राण्यांना सांगितली. तेव्हां सगळीकडे एकच गोंधळ माजला. ती बातमी वाऱ्यासारखी सगळीकडे पसरली तेव्हां तर सर्व राज्यांत हाहाःकार उडाला.

● ● ●

**दुर्गम अरण्यांत आंधळ्याला मदत**

नंतर त्या गोंधळाचा फायदा घेऊन हत्ती बनलेला भीमभट

राजधानींतून बाहेर पडला व एका गर्द अरण्यांत येऊन एका सरोवराच्या कांठीं राहूं लागला. कित्येक दिवस त्यानें अशा तऱ्हेनें निबिड जंगलांत काढले. एके दिवशीं तो हत्ती सरोवरावर पाणी पिण्यासाठीं आला असतां, थकलाभागलेला एक आंधळा रस्त्यानें चांचपडत जातांना त्याला दिसला. त्याला कित्येक दिवस अन्नपाण्यावांचून कंठावे लागले असतील, असें त्याच्या चेहऱ्यावरूनच दिसत होतें. हत्तीला त्याची दया आली. त्यानें आपल्या सोंडेंत पाणी भरून घेतलें. वाटेवरील वृक्षांचीं कांहीं गोड फळें तोडून त्यानें तीं सोंडेंत पकडली व तो त्या आंधळ्याजवळ आला. पंख्याप्रमाणें असलेल्या आपल्या कानांनीं त्याला वारा घालीत तो म्हणाला, " बाबा रे ! वाटचालीच्या श्रमांमुळें तूं बराच दमलेला दिसतोस. तुझे मित्र कोठें गेले ? मीं आणलेलीं हीं गोड फळें खा. मग मी देतों तें गार पाणी पी, म्हणजे तुला थोडें बरें वाटेल. " असें म्हणत त्यानें तीं फळें आंधळ्याच्या हातांत दिलीं. सोंडेचा स्पर्श होतांच तो आंधळा दचकला. तेव्हां हत्तीनें त्याला आपलें खरें रूप सांगून धीर दिला. अमृताप्रमाणें गोड अशीं तीं फळें खाऊन त्या आंधळ्याची भूक शांत झाली. नंतर ओंजळीनें हत्तीच्या सोंडेंतील पाणी पिऊन तो बराच ताजातवाना झाला. नंतर हत्तीनें त्याला एका गर्द झाडाच्या सांवलींत आणलें व तेथें विश्रांतीसाठीं थांबण्याची विनंति केली. तो आंधळा सांवलींत झाडाला टेकून बसल्यावर हत्तीनें त्याची चौकशी केली. तेव्हां आंधळा आपली हकीगत त्याला सांगूं लागला.

• • •

## आंधळ्या प्रचंडशक्तीचें पूर्ववृत्त

तो म्हणाला, " मित्रा ! तुझ्या मदतीबद्दल मी तुझा अत्यंत ऋणी आहें. माझ्याबद्दल तूं इतका आपलेपणा दाखवितोस, म्हणून मी माझी हकीगत तुला सांगतों. माझें नांव प्रचंडशक्ति. अयोध्येच्या

राजानें आपला मुलगा मृगांकदत्त याला कांहीं अपराध नसतां, आम्हां दहा मंत्र्यांसह हद्दपार केलें. तेव्हां मृगांकदत्ताबरोबर आम्ही मंत्रीहि राजधानींतून बाहेर पडलों. नंतर एका ओसाड अरण्यांत आम्ही आलों असतां, एका झाडाखालीं एक तरुण मांत्रिक तपश्चर्या करीत बसलेला आम्हांला दिसला. 'पारावत' नांवाच्या एका बलाढ्य व विषारी नागाजवळ असलेलें दिव्य खड्ग मिळविण्यासाठीं तो तपश्चर्येला बसला होता. 'पारावत' नाग विंध्यारण्यांतील एका सरोवराच्या तळाशीं रहात असल्यानें दुसऱ्याच्या मदतीशिवाय, केवळ तपःसामर्थ्यानें त्याचा पाडाव करणें त्या तरुणाला जमलें नाहीं. म्हणून तो निराश होऊन आत्महत्या करण्याच्या विचारांत होता. त्याची ही हकीमत ऐकून राजपुत्र मृगांकदत्तानें त्याला हवें तें साहाय्य देण्याचें आश्वासन दिलें. तें आश्वासन मिळतांच तो तरुण त्या सरोवराजवळ आला व त्यानें एक सर्पयज्ञ आरंभिला. नागराजानें त्याच्या यज्ञांत अनेक विघ्नें आणलीं; पण त्या तरुण मांत्रिकानें आपल्या मंत्रसामर्थ्यानें व मृगांकदत्तानें आपल्या शस्त्रबलानें सर्व विघ्नांचा फडशा पाडला.

त्याचा हा सर्पयज्ञ चालू असतां, तेथील एका शिंशिपा वृक्षांतून एक दिव्य स्त्री अकस्मात् प्रकट झाली. तिच्या सौंदर्यानें तो तरुण मांत्रिक मोहून गेला. यज्ञावरील त्याचें लक्ष उडालें. त्याचा मंत्र चुकला. त्याबरोबर 'पारावत' नाग विषारी फूत्कार सोडीत त्या सरोवरांतून उफाळून वर आला व त्यानें त्या तरुण मांत्रिकाला दंश केला. त्या वेळीं तो मांत्रिक जागच्या जागीं मरून पडला. नंतर आमच्याकडे वळून पारावत म्हणाला, " तुम्हीं या दुष्टाच्या नादीं लागून माझा द्रोह केला, त्याबद्दल कांहीं काळ तुमचा एकमेकांशीं वियोग होईल. " असें म्हणून तो नाग पुनः सरोवरांत निघून गेला.

पारावताच्या शापामुळें आमची ताटातूट झाली. त्याच्या ... त्या

विषारी फूत्कारांनीं मी तर आंधळाच बनलों. नंतर रस्ता चुकल्यानें या दाट जंगलांत अन्नपाण्यावांचून मी धडपडत व चांचपडत कोणाची मदत मिळते का तें पहात होतों. माझ्या सुदैवानें तूं मला भेटलास व मला संकटांतून मुक्त केलेंस. माझी दृष्टि परत मिळण्याचा कांहीं मार्ग असला तर तो सांग, म्हणजे मी तुझा जन्मोजन्मीं ऋणी राहीन. माझ्यावर उपकार करणारा तूं आहेस तरी कोण ? हत्ती असूनहि तुला मनुष्यावाणी कशी प्राप्त झाली आहे, हें सर्व जाणण्याची माझी इच्छा आहे. कृपा करून मला तुझी माहिती सांग."

प्रचंडशक्तीची ती विनंति ऐकून हत्तीनें त्याला आपली सर्व हकीगत थोडक्यांत सांगितली व तो पुढें म्हणाला, " मित्रा, मीहि उत्तंक मुनींच्या शापामुळें हत्ती बनलों आहें. पण आपणा दोघांच्याहि शापांचा शेवट आतांच होणार असें दिसतें." असें तो बोलत आहे, तोंच त्याचा हत्तीचा आकार कोठल्या कोठें लुप्त झाला आणि एका सुंदर गंधर्वांत त्याचें रूपान्तर झालें. त्या गंधर्वानें प्रचंडशक्तीकडे दृष्टिक्षेप टाकण्याचा अवकाश, प्रचंडशक्तीची दृष्टि निवळली व त्याला पूर्वीप्रमाणें दृष्टि आली. त्याचा आनंद गगनांत मावेना. त्यानें त्या गंधर्वाचे शतशः आभार मानले.

• • •

## मृगांकदत्ताची भेट व भीमभटाचें गंधर्वलोकीं प्रयाण

प्रचंडशक्ति व हत्ती यांचा संवाद चालू असतां मृगांकदत्तहि आपल्या परत भेटलेल्या कांहीं मित्रांसह त्या सरोवराच्या तीरावर आला होता. हत्ती मनुष्यवाणीनें बोलत असल्याची चाहूल लागल्यानें आश्चर्यचकित होऊन, तो त्यांचा संवाद झाडाआड दडून ऐकत होता. तो आंधळा तरुण म्हणजे आपलाच सचिव प्रचंडशक्ति आहे, हें समजल्यावर त्याला-हि अत्यंत आनंद झाला. हत्तीचें गंधर्वांत रूपांतर झाल्यावर व प्रचंड-शक्तीला दृष्टि लाभल्यावर मृगांकदत्ताला रहावलें नाहीं. धांवत येऊन

प्रचंडशक्तीला त्यानें कडकडून मिठी मारली. मृगांकदत्ताच्या भेटीनें प्रचंडशक्तीचा आनंद द्विगुणित झाला. दोघांनींहि त्या गंधर्वाला वंदन केलें व ‘ आमच्यावर आपला नेहमींचा अनुग्रह असावा ’ अशी विनंति केली. तेव्हां तो गंधर्व मृगांकदत्ताला उद्देशून म्हणाला, “ वीरा ! संकटांत धैर्य खचूं न देतां तूं असाच आपल्या कार्याला लाग, म्हणजे विजयश्री तुलाच माळ घालील. तुला जेव्हां माझी मदत लागेल त्या वेळीं तूं माझें स्मरण कर, म्हणजे मी तुझ्या मदतीला धांवून येईन. लवकरच तुझे इतर मित्र तुला भेटतील व तूं आपल्या पराक्रमानें पृथ्वीवरील सम्राट बनशील. ” असा आशीर्वाद देऊन गंधर्व बनलेला भीमभट आकाशांतून उड्डाण करीत गंधर्वलोकाला निघून गेला. इकडे त्याच्या आशीर्वादाप्रमाणें मृगांकदत्ताला त्याचे सर्व मित्र लवकरच भेटले व त्यांच्या मदतीनें आणि स्वतःच्या पराक्रमानें मृगांकदत्त पृथ्वीवरील प्रसिद्ध सम्राट बनला.

अनुक्रमांक
विभाग
क्रमांक
नों. दि.

१. रघुवंश
२. शाकुन्तल
३. विक्रमोर्वशीय
४. मृच्छकटिक
५. प्रतिमा
६. महावीरचरित
७. उत्तररामचरित
८. मालतीमाधव
९. स्वप्नवासवदत्ता
१०. दशकुमारचरित ( १ )
११. दशकुमारचरित ( २ )
१२. वेणीसंहार
१३. कुमारसम्भव
१४. मालविकाग्निमित्र
१५. हर्षचरित
१६. नागानंद
१७. पंचरात्र
१८. रत्नावली
१९. कादम्बरी
२०. मेघदूत
२१. शिशुपालवध
२२. किरातार्जुनीय
२३. बुद्धचरित
२४. मुद्राराक्षस
२५. प्रतिज्ञायौगंधरायण
२६. अविमारक
२७. अभिषेक
२८. मध्यमव्यायोग
२९. कर्णभार
३०. ऊरुभङ्ग
३१. पार्वतीपरिणय
३२. नलोदय-नैषध

श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री

# संस्कृत साहित्य सरिता

श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री

कालिदासाचें 'शाकुन्तल', शूद्रकाचें 'मृच्छकटिक' किंवा बाणाची 'कादम्बरी' हीं सामान्य मराठी वाचकाच्या दृष्टीनें केवळ ऐकलेलीं नांवें असतात; परंतु त्या नांवांच्या पुस्तकांत काय लिहिलेलें आहे हें थोडक्यांत, सोप्या भाषेंत, चटकन् समजलें तर किती बहार होईल !

✤ ✤ ✤

विद्यार्थी, नवशिक्षित, अल्पशिक्षित व सामान्य वाचक-वर्ग यांसाठीं

✤ ✤ ✤

संस्कृत वाङ्मय मराठींतून गोष्टीरूपानें. प्रत्येक काव्य-नाटकाचें स्वतंत्र पुस्तक. ३२ पानांचें एक पुस्तक : प्रत्येकीं ६ आणे. पुट्ठ्याच्या मजबूत पेटींतून विविध रंगी बत्तीस पुस्तकें; एकत्र संच : १२ रुपये

वोरा ॲण्ड कं ायव्हेट लि.
३ राउंड बिल्डिं ता, मुंबई २.

IRBK-0106270
IRBK-0106270